पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - २२२**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - ०३/०५/२०१६ वेळ - दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ०३/०५/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
३) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
४) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
५) मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

याशिवाय मा.डोईफोडे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले–मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.दंडवते, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.कपिले, मा.थोरात, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.शेख, मा.पुजारी, मा.मोरे, मा.भोसले, मा.सोनवणे-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२०) नाशिक फाटा ते वाकड रस्त्यावर बी.आर.टी.एस. बस स्टेशन बांधणे भाग -१ या कामास सुधारीत मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२१) वाढ/घट करणेस मान्यता देणेबाबत - मा. नारायण बहिरवाडे व मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) मनपाच्या जैव विविधता समिती व विधी समितीच्या सदस्यासह मा. महापौर इ.च्या सिक्कीम येथील विविध प्रकल्प पाहणीसाठीचे दौ-याबाबत.

विषय क्र.२३) शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत अंजठानगर येथील प्रकल्पामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे. (सुधारीत नि.र.रु. ४८,००,०००/- )

विषय क्र.२४) शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत विठ्ठलनगर येथील प्रकल्पामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे. (सुधारीत नि.र.रु. ४८,००,०००/- )

विषय क्र.२५) प्रभाग क्र. ९ मधील बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयाचे नुतनीकरण करणे. (सर्पोद्यान सुधारणा करणे)

विषय क्र.२६) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी, अण्णासाहेब मगर स्टेडीअम बालेवाडीच्या धर्तीवर करणे व नॅशनल लेवलचे बणविणे. (अ) येथील जलतरण तलावाची नव्याने दुरुस्ती करणे व मजबुतीकरण करणे) या कामाचे सुधारीत खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.२७) तालेरा रुग्णालयाच्या नविन इमारतीमधील व बाह्य परिसरातील साफ-सफाईचे कामाबाबत.

विषय क्र.२८) वाय.सी.एम.एच.मधील सिटी स्कॅन सेंटर चालविण्याच्या संविदेस मुदत वाढीबाबत.

विषय क्र.२९) चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र येथील तळयातील गाळ काढणे व सुशोभिकरण करणे.

विषय क्र.३०) पिं.चिं. मनपाच्या मैलाशुध्दीकरण केंद्रात तयार होणा-या स्लजची वाहतुक करणे.

विषय क्र.३१) मे. रुबी एलकेअर यांना वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. सेंटर चालविणेकामी मुदत वाढ देणेबाबत.

विषय क्र.३२) प्रभाग क्र. २७ मधील आय.टी.आय. इमारतीची स्थापत्य विषयक कामे करणे.

विषय क्र.३३) प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील शिंदेवस्ती येथील बी.आर.टी.एस. रस्ता ते रेल्वे लाईन पर्यंत रस्ता विकसीत करणे.

विषय क्र.३४) मनपाचे गणवेश देय महिला कर्मचा-यांकरिता सन २०१४-१५ व २०१५-१६ करीता शासन दर करारानुसार महिला गणवेश खरेदी करणेबाबत.

विषय क्र.३५) प्रभाग क्र.९ संभाजीनगर मधील मुख्य रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे व अधुनिकरण, सुशोभिकरण करणे.

विषय क्र.३६) ज्ञान प्रबोधिनीचे माजी प्राचार्य व कार्यवाह मा.श्री.वा.ना. अभ्यंकर यांना महानगरपालिकेच्या वतीने मानपत्र देणेबाबतच्या कार्यक्रमासाठी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३७) क व ड प्रभागातील (क, ड व ई) स्लजची मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणे.

विषय क्र.३८) मा.महापौर यांचे दिनांक ३०/०४/२०१६ चे पत्रानुसार मा.सत्तारूढ पक्षनेत्यांसह एकुण सहा महिला सदस्यांच्या सिक्कीम येथील विविध प्रकल्पाचे पहाणी दौ-याबाबत.

विषय क्र.३९) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी मधील हेगडेवार क्रीडा संकुल येथे दिनांक १/०५/२०१६ रोजी होणा-या माजी महापौर कै.भिकु वाघेरे पाटील ५६ वी महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग स्पर्धा २०१६-२०१७ या स्पर्धेकरिता ध्वनिक्षेपण जनित्र संच व प्रकाश व्यवस्था करणे.

विषय क्र.४०) विभागातील कार्यालयाकरिता आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीबाबत.

विषय क्र.४१) पिंपरी चिंचवड मनपासाठी घनकचरा व्यवस्थापन पर्यावरण संवर्धन वायु प्रदुषण व सांडपाणी प्रक्रिया पुर्नवापर प्रकल्प इत्यादी करिता विविध अत्याधुनिक प्रकल्प राबविणेकामी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. इन्फ्रा. इन यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.४२) चिखली मैलाशुध्दीकरण केंद्रातील उर्वरित जागेत लॅन्डस्केप डिझाईन करणे व तर स्थापत्यविषयक कामे करणे.

विषय क्र.४३) मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचेकरिता नविन वाहन खरेदी करणेबाबत.

विषय क्र.४४) ठरावात दुरूस्ती करणेबाबत–मा.नारायण बहिरवाडे व मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) सन २०१६-१७ चे मंजूर अंदाजपत्रकातील तरतूदींमध्ये निविदा कार्यवाहीसाठी वाढ/घट अन्वये फेरबदलास मान्यता मिळणेबाबत – मा.नारायण बहिरवाडे व मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) वॉर्ड क्र.२४, ४२ मधील जलनि:सारण व्यवस्था सुधारणा कामे करणे या कामाचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत - मा.नारायण बहिरवाडे व मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४७) वॉर्ड क्र.५० पद्मजी पेपर मील थेरगाव परिसरातील जलनि:सारण विषयक कामे करणे व उर्वरीत ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामाचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत-मा.नारायण बहिरवाडे व मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४८) आपत्ती व्यवस्थापन विभागाचे मुख्य समन्वयक तथा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल यांची मानधनावरील कामकाजाची मुदत संपत आली असल्याने त्यांना एकत्रित मानधनावर नेमण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजूरी देणेबाबत-मा.नारायण बहिरवाडे व मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक-मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक- मा.संदीप चिंचवडे

सभा कामकाजात काही अति महत्वाचे विषय असल्याने त्यांचा अभ्यास करणेकामी आजची सभा शुक्रवार दिनांक ०६/०५/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

सभापती - सभा शुक्रवार दिनांक ०६/०५/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा.पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २२२**

**(दिनांक ०३/०५/२०१६ ची तहकुब सभा)**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - ०६/०५/२०१६ वेळ – सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०३/०५/२०१६ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०६/०५/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.सौ. साळुंके सविता सुरेश
३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
५) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
८) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
९) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
१०) मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
११) मा.नेटके सुमन राजेंद्र
१२) मा.लोंढे शुभांगी संतोष
१३) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगूडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.दुधेकर, मा.सवणे, मा.चव्हाण, मा.कपिले, मा.थोरात, मा.लडकत, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.शेख, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.बोदडे, मा.भोवरे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २६/०४/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.२२१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक –१६१०९ विषय क्रमांक – १

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/८३/१६ दि.२२/०४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४१/२/२०१५-१६ थेरगाव प्र.क्र.५० मध्ये गावठाण येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास मेघडंबरी करणेकामी मे.सागर कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२०,१६,२८५/- (अक्षरी र.रु.वीस लाख सोळा हजार दोनशे पंच्याऐंशी रुपये फक्त) पेक्षा ९.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१९,२६,५६०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११० विषय क्रमांक – २

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग-स्थापत्य

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/८४/१६ दि.२२/०४/२०१६

विषय -प्रभाग क्र.२१ दळवीनगर लोकमान्य हॉस्पिटल जवळ वेस्टन पद्धतीचा सुलभ शौचालय बांधणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१११ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- उद्यान

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२१७/२०१६ दि.२०/०४/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस विचारात घेऊन –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.३/२०१५-१६ अन्वये मनपाचे आरक्षक क्र.३०२ बर्ड व्हॅली उद्यान व नौकानयन भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबत मे.गजराज बोटींग क्लब या ठेकेदाराची (एकुण प्राप्त उत्पन्नापैकी मनपास मिळु शकणारे उत्पन्न (१० टक्के)

र.रु.१७,३८,८००/- (अक्षरी र.रू. सतरा लाख अडोतीस हजार आठशे फक्त) पेक्षा ठेकेदारास मिळणा-या एकुण उत्पन्नापैकी मनपास २४.५० टक्के या निविदा मंजुर दराने तीन वर्षे कालावधीसाठी मिळणारे भाडे शुल्क रक्कम रुपये ४,२६,००६/- असे प्रतिवर्ष र.रु.१,४२,००२/- या प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मे.गजराज बोटींग क्लब यांचा पुर्वानुभव विचारात घेता व नौकानयनातील जोखीम विचारात घेता मे. गजराज बोटींग क्लब यांस सदरचे दराने व अटी शर्तीनुसार पाच वर्षे कालावधीकरीता नौकानयन भाडे तत्वावर चालविण्यास देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११२ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भः-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१८६/२०१६ दि.१६/०४/२०१६
विषय–मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील मोठ्या झालेल्या वृक्षांचे पिंजरे काढून दुरूस्त करून पुरविणेबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११३ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१८५/२०१६ दि.१६/०४/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१८/२०१४-१५ अन्वये मनपा परिसरातील वृक्षांचे मनपा हद्यीत पुर्नरोपण करणेकामी मे.जी.बी.इंन्टरप्रायजेस नि.र.रू. २९,७०,९८७/- (अक्षरी र.रू. ऐकोणतीस लाख सत्तर हजार नउशे सत्याऐंशी फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदापत्रकीय दरापेक्षा (-१०.७०% कमी) सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करून घेणेस व प्रस्तुतकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११४ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- पाणी पुरवठा

सुचक – मा.संदिप चिंचवडे अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/७८१/२०१६ दि.२५/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जे.एन.एन.यु.आर.एम. टप्पा १ अंतर्गत शहराच्या ४०% भागात २४x७ पाणीपुरवठा योजना राबविणेचा प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने हाती घेतला आहे. सदर ४० टक्के भागासाठीच्या कामाच्या र.रु.१४३.१७ कोटी रकमेच्या डीपीआरला केंद्र शासनाने मंजूरी प्रदान केलेली आहे. सदर १४३.१७ कोटी या रकमेत देखभाल दुरुस्तीच्या खर्चाचा समावेश नसून सदरची रक्कम फक्त Construction कामासाठीची आहे. मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र. १५।१।२०१५-१६ मधील पिंपरी चिंचवड शहराच्या ४० टक्के भागात २४X७ पाणीपुरवठा करणे या कामांतर्गत “Implementation of continuos (24X7) pressurised water supply in 40% area of Pimpri Chinchwad & Operation & Maintenance of the system for five years.” या कामासाठी मागविलेल्या निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

* कामाचे नाव –“Implementation of continuos (24X7) pressurised water supply in 40% area of Pimpri Chinchwad & Operation & Maintenance of the system for five years.”·
* निविदा क्र. – १५।१।२०१५-१६
* निविदा र.रु. - Item Rate Tender असल्याने Operator कडून दर मागविण्यांत आला.
* बयाणा रक्कम – १,४३,००,०००।–
* अंदाजपत्रकीय तरतूद – सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. ४० कोटी
* कामाची मुदत – २+५ वर्षे·
* निविदा प्रसिद्धीचे दैनिकाचे नाव– दै. नवभारत टाईम्स, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै.टाईम्स ऑफ इंडिया
* निविदा विक्री दिनांक - ०६।११।२०१५ ते दि २३/०२/२०१६
* निविदापूर्व बैठक दिनांक - २६।११।२०१५
* निविदा स्विकृती दिनांक – २३।०२।२०१६
* निविदा उघडल्याचा दिनांक -२५/०२/२०१६
* निविदा फॉर्म विक्री संख्या – ०२

दोन्ही ठेकेदारांनी भरलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे तयार केलेला आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| १ | मे.विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. | र.रु.२,०७,५८,२९,४२४/- |
| २ | मे.एसपीएमएल इन्फ्रा.प्रा.लि. | र.रु. ३,१६,९२,३७,९१६/- |

तांत्रिक मान्यतेची २१७.१५ कोटी ही रक्कम व सर्वात कमी दराची मे. विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या दरांचे विश्लेशन विचारात घेता सदरची सर्वात कमी दराची मे. विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची विषयांकित कामासाठी र.रु.२,०७,५८,२९,४२४।- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे सात कोटी अठ्ठावन्न लाख एकोणतीस हजार चारशे चोवीस फक्त ) निविदा स्विकृत करण्यास तसेच सदर ठेकेदाराशी करारनामा करून घेणेस व त्याकरिता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल – ११ प्रतिकुल – २

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११५ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/१९६/२०१६ दि.२५/४/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागातील खिडक्यांना पडदे, पाइप व साईड ब्राकेट (पसंत नमुन्या प्रमाणे) फिटींगसह खरेदीकामी ऑनलाईन कोटेशन नोटिस क्रं ४८/२०१५-१६ प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त कोटेशनमधील मे.स्टार फॅब्रिक्स निगडी यांचे पडदे खरेदीसाठी यांचेकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकुण र.रु.१,२३,८४६/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११६ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/४५६/२०१६ दि.२५/०४/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे मा.पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल संच साहित्य खरेदीकरणेकामी कोटेशन नोटीस क्र.४३/२०१५-१६ अन्वये बंद पाकीटात कोटेशन दर मागविणेत आले होते. त्यानुसार चार दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.धर्मे एंटरप्रायजेस यांचे Samsung Galaxy A५ प्रती नग र.रु.१९,४९०/- असे एकूण ०५ नगांसाठी एकूण र.रु.९७,४५०/- साहित्याचे लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३.३९% ने जास्त आहे. मे.धर्मे एंटरप्रायजेस यांचे आवश्यक मोबाईल संच खरेदीकामी एकूण र.रु.९७,४५०/- दर स्विकृत करणेत आले आहेत. सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११७ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- अ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/०५/कावि/१८९/२०१६ दि.२५/०४/२०१६
विषय–निगडी येथील कै.मधुकर पवळे उड्डाणपुलाखालील जागा वाहनतळासाठी ११ महिने कालावधीकरिता श्री.केशव दत्तात्रय थोरात रा.निगडी, पुणे-४४ यांना भाड्याने देणेबाबत.

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११८ विषय क्रमांक – १०
दिनांक –०६/०५/२०१६ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/४/कावि/११२/१६ दि.२६/४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.क्वालिटी केटरर्स यांना वाय.सी.एम. रुग्णालयातील कॅन्टीन चालविणेस देणे तसेच राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत नोंदणी झालेल्या रुग्णांना प्रतिदिन प्रति रुग्ण आहार र.रु.९०/- या मंजुर दराने दि. १/१/२०१६ पासून दि.८/३/२०१६ कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व त्यानुसार आलेल्या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६११९ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- विद्युत मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२१३/२०१६ दि.२६/०४/२०१६

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१८/२०१५-१६ मधील अ.क्र.२ अन्वये प्रभाग क्र ५३ मधील वाकड परिसरातील दिवाबत्ती व्यवस्थेतचे नुतनीकरण करणे कामी मे. आर एन एंटरप्रायजेस नि.र.रू.११,९९,९९९/- (अक्षरी र.रु. अकरा लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव फक्त) पेक्षा ३५.२०% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२०
विषय क्रमांक – १२
दिनांक – ०६/०५/२०१६
विभाग- विद्युत मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे
अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:- मा.विकास अभियंता(वि/यां) यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१९२/२०१६ दि.२६/०४/२०१६
विषय:- कार्यशाळा येथे सी. सी. टि. व्ही. यंत्रणा उभारणे बाबत.

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२१
विषय क्रमांक – १३
दिनांक – ०६/०५/२०१६
विभाग- नगररचना व विकास
सुचक – मा.अमिना पानसरे
अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१६/८७/२०१६ दि.२७/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे मोशी येथील शिवाजीवाडी मधील गट.नं.४८ जूना (गट नं.४९)मधील ६०.०० मी पुणे-नाशिक महामार्गापासून गट नं.१५१ (जूना गट नं.१५१) मधील देहू-आळंदी ३०.०० मी रस्त्यापर्यतचा रस्ता विकसित करणेसाठी जमीन संपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर रस्तारूंदीकरणाखालील जमिन खाजगी मालकीची असल्याने रस्तारूंदीने बाधीत होणा-या क्षेत्राचे भूसंपादन करणे आवश्यक असल्याने रस्ता रूंदीने बाधीत जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतूदी अंतर्गत भूसंपादन करणेस मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.०७, दि.७/१०/२०१५ अन्वये तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.७६९, दि.२०/११/२०१५ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. सदर रस्त्याच्या भुसंपादनापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व सदरचे खर्चाचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२२
विषय क्रमांक – १४
दिनांक – ०६/०५/२०१६
विभाग- माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा.अमिना पानसरे
अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/४/कावि/२५२/२०१६ दि.२७/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम हॉस्पीटल याठिकाणी राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजना राबविणेत आलेली आहे . योजनेतील लाभार्थी रुग्णांची संपुर्ण माहिती Online शासकिय संस्थेकडे संगणकीकृत भरणेकरीता भारत संचार निगम लि. ची ४mbps इंटरनेट लीज लाईन (ILL) आदेश क्रमांक-ई- गव्ह/४/कावि/५२०/२०१४ दि.१४/०८/२०१४

अन्वये दिनांक १०/०२/२०१५ पासून पुरविणेत आलेली आहे. सदरच्या कामकाज खर्चास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ७१८७ दिनांक ८/०७/२०१४ अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. राजीव गांधी जिवनदायी आरोग्य योजना करीता मे.भारत संचार निगम लि. ४mbps इंटरनेट लीज लाईन (ILL) चे ९ फेब्रुवारी २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीचे बील रक्कम रुपये ६,४७,९६८/- (अक्षरी र.रू. सहा लाख सत्तेचाळीस हजार नऊशे अड्डसष्ट फक्त) चे खर्चास तसेच प्रति वर्षी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२३ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- उद्यान
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१७३/२०१६ दि.१२/०४/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.३४/२०१५-१६ क,ड,ई क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रस्त्याचे कडेने लागवड केलेल्या झाडांची आळी करणे करीता मे.निशांत इंटरप्रायजेस कोटेशन नोटीस र.रू.१,२१,८००/- (अक्षरी र.रू. एक लाख एकवीस हजार आठशे फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३% ने कमी या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/४/कावि/१७२/२०१६ दि.११/०४/२०१६ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२४ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- उद्यान
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१७३/२०१६ दि.१३/०४/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.०१/२०१६-१७ करीता पुणे मुंबई हमरस्ता निगडी ते दापोडी रस्ता सुशोभिकरण व रस्त्याचे कडेच्या वृक्षारोपणासाठी टँकरने पाणीपुरवठा करणे करीता मे.दत्त ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स कोटेशन नोटीस र.रू.१,९६,६५०/- (अक्षरी र.रू.एक लाख शहाण्णव हजार सहाशे पन्नास फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा १७.५५% कमी दराने (र.रू.१,६२,१३८/-) कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/४/कावि/१७८ /२०१६ दि. १२/०४/२०१६ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२५ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- उद्यान

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१७१/२०१६ दि.१२/०४/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.३०/२०१५-१६ करीता मनपाचे क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रस्त्याचे कडेचे वृक्षारोपणासाठी ५००० ली क्षमतेच्या टँकरणे पाणीपुरवठा करणेकरीता मे.शिवामृत वॉटर सप्लायर्स कोटेशन नोटीस र.रू. १,८९,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख एकोननव्वद हजार फक्त) अंदाजपत्रकिय दराने (७००/- प्रति ट्रिप) कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/४/कावि/१७०/२०१६ दि.११/०४/२०१६ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२६ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कमु/३७८/२०१६ दि.२५/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भोसरी एम.आय.डी.सी आरक्षण क्र.४०, प्लॉट क्र.टी २०१ येथे लघुउद्योजकांच्या पुनर्वसनासाठी इमारत बांधणे या प्रकल्पासाठी महापालिका सभेने मंजुरी दिलेली आहे. सदर प्रकल्पाचे नकाशे एम.आय.डी.सी कडे मंजुरीसाठी पाठविणेत आली आहेत. सदर नकाशे मंजुरीसाठी डेप्युटी चिफ ऑफिसर एम.आय.डी.सी मुंबई ९३ यांचे कडील अग्निशमन ना हकरत दाखल्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने त्यांचे दि.२९/०२/२०१६ चे पत्रान्वये फायर प्रोटेक्शन फंड र.रू २,०१,७९५/- ची फी डिमांड ड्राफ्टने कार्यकारी अभियंता सिव्हिल डिव्हीजन चिंचवड पुणे यांचे नावे देणेबाबत मा.कार्यकारी अभियंता एम.आय.डी.सी.सिव्हील डीव्हीजन चिंचवड पुणे यांनी कळविले आहे. यापुर्वी र.रू.२७,६३,६५०/- ची फी डिमांड ड्राफ्टने कार्यकारी अभियंता एम.आय. डी.सी सिव्हील डिव्हीजन पुणे यांचे नावे दि.२/७/२००८ रोजी अग्निशमन ना हरकत दाखला मिळणेकामी अदा करणेत आलेली आहे. मनपाने दि.१/२/२०१६ रोजी अग्निशमन ना हरकत दाखला मिळणेकामी अर्ज केला असता त्यांनी त्यांचेकडील पत्र **क्र.**No/MIDC/Hinj/fire/FMS-A६४४०७ Dt.२९/०२/२०१६ नुसार उर्वरित फायर प्रोटेक्शन फंड रक्कम रू. २,०१,७९५/- भरणेबाबत मनपास कळविले आहे. सदर उर्वरीत अग्निशमन सुधारीत ना हकरत दाखला मिळणेकामी फायर प्रोटेक्शन फंड रक्कम रू.२,०१,७९५/- एम. आय. डी. सी. ला मागणी केलेप्रमाणे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१२७ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- बीआरटीएस
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/पीसीएमसी/बीआरटीएस/२२९/२०१६ दि.१३/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या बीआरटीएस विभागाकडील काळेवाडी फाटा ते पवना नदीपर्यंतच्या रस्त्यावर एम्. एम्. स्कुल या ठिकाणी सबवे बांधणे या कामी मे. सी.व्ही. कांड कन्सल्टंटस् प्रालि. यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व महापालिकेच्या प्रचलित दरानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना स्विकृत निविदा रकमेच्या (Accepted Tender Cost) २.३५% फी (निविदापूर्व बाबींसाठी ०.९०% व निविदापश्चात बाबींसाठी १.४५%) + सेवा कर फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले-</u>**

ठराव क्रमांक – १६१२८ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य बीआरटीएस
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र./स्था/बीआरटीएस/३०९/२०१६ दि.०३/०५/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड मनपा मार्फत एकुण ४ बीआरटीएस कॉरीडॉर विकसित करण्यात येत आहेत. या ४ कॉरीडॉर पैकी सांगवी किवळे या बीआरटीएस कॉरीडॉरवर सप्टेंबर २०१५ मध्ये बीआरटीएस बस सेवा यशस्वीरित्या चालू झालेली आहे. तसेच नाशिक फाटा – वाकड या कॉरीडॉरवर दि.२५/११/२०१५ रोजी बीआरटीएस बस सेवा सुरु करण्यात आलेली आहे. सदर कामासाठी सा.बां.विभाग पुणे सन २०१२-१३ दरसुची वापरण्यात आली आहे. विषयांकित कामासाठी मा.महापालिका सभा ठराव क्र.५८४७ दि.२२/०५/२००६ अन्वये र.रु. ३८३८.४० कोटीस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यामूळे वाढीव खर्चासाठी पुनश्च मनपा सभेची मान्यता घेण्याची अवश्यकता नाही. झालेल्या वाढीव खर्चास फक्त मा. स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेणे अवश्यक आहे. विषयांकित कामासाठी एकुण र.रु. ४,२५,४३,०३८/- इतका खर्च येणार आहे. त्यापैकी र.रु. ३,९८,०२,७३८/- चे खर्चास मा. स्थायी समिती ठराव क्र.४८८७ दि.१९/११/२०१३ अन्वये मान्यता असून उर्वरित र.रु. २७,४०,३००/- चे वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१२९ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०६/०५/२०१६

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ:-मा.नारायण बहिरवाडे, मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महोनगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक – ३ मधील जेएनएनयुआरएम मधील प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देण्यात येत आहे. (वाढ/घट र.रू. १७,४१,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३० विषय क्रमांक – २२

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र./पअक/४/कावि/२९३/२०१६ दि.२९/०४/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड मनपामधील जैवविविधता समिती, विधी समिती मधील काही सदस्यांसह मा.महापौर यांनी देशातील पहीले सेंद्रीय राज्य म्हणून घोषित झालेल्या सिक्कीम राज्यातील विविध प्रकल्पांची पहाणी करणेसाठी दौ-याचे आयोजन करणेची मागणी केली आहे. त्यानुसार दिनांक ०८ मे २०१६ ते दिनांक १३ मे २०१६ दरम्यान मा.महापौरांसह मा.जैवविविधता समिती, विधी समिती व स्थायी समितीतील काही सदस्य व मनपाचे अतिरिक्त आयुक्त व कार्यकारी अभियंता, पर्यावरण असे एकूण १४ जणांच्या सिक्कीम येथील दौ-यासाठी येणा-या खर्चासाठी मागविणेत आलेल्या कोटेशन पैकी सर्वात कमी मे.सदगुरु ट्रॅव्हल्स अन्ड टुर्स, पिंपरी यांचे र.रु.८,६३,८००/- + टॅक्सचे खर्चास मान्यता देणेचा तसेच सदरच्या खर्चापैकी मा.महापौरासह सदस्यांचा खर्च नगरसचिव विभागाकडील "मा.सदस्यांचा अभ्यासदौरा व प्रशिक्षण" या लेखाशिर्षातून तसेच अधिका-याचा खर्च पर्यावरण विभागातील "अभ्यास दौ-यासाठी लागणारा खर्च" या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३१ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य बीएसयुपी प्र.

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र./स्था/BSUPप्र/१४०/२०१६ दि.०३/०५/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

JnNURM - BSUP झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत अजंठानगर येथे पार्किंग + ७ मजल्यांच्या (P+७) ७ इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतींचे बांधकाम ठेकेदार मे.इंदू प्रोजेक्टस् लि यांनी केलेले आहे. सदर प्रकल्पालगत झोपडपट्टी क्षेत्र असल्याने A1

इमारतींमधील स्थापत्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज, विद्युत विषयक व इत्यादी कामांची तोडफोड झालेली आहे.मा.सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग यांनी त्यांचे क्र. झोनिपू /अजंठा/१०/कावि/२४७/२०१५,दि.२८/०८/२०१५ चे पत्रानुसार अजंठानगर पुनर्वसनप्रकल्पातील इमारत क्र. A1 मधील पात्र ४५ लाभार्थ्यांचे ताबा आदेश देण्यात आले असून उर्वरित लाभार्थ्यांच्या ताबा आदेशाची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे सदर इमारतीमधील स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा व ड्रेनेज इत्यादी कामांची दुरुस्ती करण्यात येवून सदर इमारत राहण्यास सुसज्ज करण्यात येवून ताबा आदेश झालेल्या लाभार्थ्यांना सदनिकांचे हस्तांतरण करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार सदर इमारतीचे स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा व ड्रेनेज इत्यादी कामांची दुरुस्ती निविदा क्र.१४-२/२०१५-१६ मधून या विभागामार्फत सुरु असून अद्यापपर्यंत ४५ सदनिकांची अंतर्गत दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यात आलेली आहे. सदर निविदेचा दर १५% कमी आहे. उर्वरित ६७ पात्र लाभार्थ्यांची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन ताबा आदेशपत्र देण्याची कार्यवाही मा.सक्षम प्राधिकारी, झोनिपू विभाग यांचेमार्फत सुरु आहे. उर्वरित सदनिकांमधील स्थापत्य, विद्युत,पाणीपुरवठा व ड्रेनेज इत्यादी कामे पूर्ण करणे या निविदेतून शक्य नाही. उर्वरित सदनिकातील स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा व ड्रेनेज इ. कामे तातडीने करणे आवश्यक आहे व याकामी मा.शहर सुधारणा समिती यांनी ठराव क्र.४९, दि.०४/०२/२०१६ अन्वये उपरोक्त कामे करणेकरिता लागणारा खर्च र.रु.४८,००,०००/- च्या सुधारीत निविदा रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली असल्याने सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम विषयांकित कामातून करणेस व त्याकामी येणारी सुधारीत निविदा र.रु.४८,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३२ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य बीएसयुपी प्र.

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र./स्था/BSUPप्र/१३९/२०१६ दि.०३/०५/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

JnNURM - BSUP झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विठ्ठलनगर येथे पार्किंग + ७ मजल्यांच्या (P+7) इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतींचे बांधकाम ठेकेदार मे. इंदू प्रोजेक्टस् लि यांनी पूर्ण केलेले आहे. सदर प्रकल्पालगत झोपडपट्टी क्षेत्र असल्याने A10 इमारतींमधील स्थापत्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज, विद्युत विषयक व इत्यादी कामांची तोडफोड झालेली आहे. मा.सक्षम प्राधिकारी यांचेकडील नाशिकफाटा येथील पात्र लाभार्थ्यांचे सोडत ची यादी या विभागास प्राप्त झाली आहे. त्यानुसार A10 इमारतीतील झोनिपु प्रशासन विभागाकडून सोडत काढलेल्या ६४ लाभार्थ्यांची प्रशासकीय बाबी पूर्ण करुन लाभार्थ्यांना ताबा आदेशपत्र देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच त्यांना इमारत क्र. A10 राहण्यासाठी सुसज्ज ठेवण्यात यावी असे कळविले आहे. सद्यस्थितीत सदर इमारतीची स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज, उदवाहक व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था इ. कामांची तोडफोड झालेली असल्यामुळे पुर्णपणे नव्याने करावी

लागणार आहेत. निविदा क्र.१४-१/२०१५-१६ अन्वये सदर इमारतीचे दुरुस्तीचे काम चालू असून सदर कामामध्ये ३ मजल्यांचे दुरुस्तीचे काम करणेत आलेले आहे. उर्वरित मजल्यांचे काम करणेसाठी सदरचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.५०, दि.०४/०२/२०१६ अन्वये दिलेली असल्याने सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम विषयांकित कामातून करणेस व त्याकामी येणारी सुधारीत निविदा र.रु.४८,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३३ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र./स्था/उद्यान/कावि/२५/२०१६ दि.३०/०४/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५४/०१/२०१५-१६ मधील काम क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.९ मधील बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयाचे नूतनीकरण करणे (सर्पोद्यान सुधारणा करणे) याकामी मे. बी के खोसे निवीदा र.रु.१४,००,०७,५२१/- (अक्षरी र.रु. चौदा कोटी सात हजार पाचशे एकवीस फक्त) पेक्षा २.१४% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,३८,६१,९२८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३४ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य फ क्षेत्रिय
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षे/स्था/१/कावि/२८९/२०१६ दि.२८/०३/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी, अण्णासाहेब मगर स्टेडीअम बालेवाडीच्या धर्तीवर करणे व नॅशनल लेवलचे बणविणे. (अ) येथील जलतरण तलावाची नव्याने दुरुस्ती करणे व मजबुतीकरण करणे) या कामासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.१२३३३ दि.०१/०९/२०१५ अन्वये नि.र.रु. १,२२,३८,६७७/- व २१% जादा दर अशी एकत्रीत र.रु. १,४८,०८,७९९/- चे खर्चास मान्यता मिळाली आहे. व मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु. ५०,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता आहे. सद्यस्थितीत सदर कामाअंतर्गत फिल्ट्रेशन युनिट मधून तलावामध्ये नव्याने एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणे, तलावामध्ये आर.सी.सी.

बॉक्स पध्दतीने कॉक्रीट करणे, सेल्फ प्रायमिंगसाठी फिल्ट्रेशन युनिटमध्ये पॉझीटीव्ह सक्शनसाठी लेवल पीट तयार करणे, तसेच सदर प्रभागातील मा.नगरसदस्य व नागरीकांच्या मागणीनुसार नुतनीकरणाच्या कामाअंतर्गत नवीन बेबी टॅक व त्याच्या फिल्ट्रेशनची, तसेच डेक एरियाची कामे करणे व तलावाच्या डेक परीसरात व्हेट्रीफाईट रफ टाईल्स आवश्यक लेव्हलनुसार बसविणे, तसेच जलतरण तलावातील बॅलेन्सींग टॅकचे नुतनीकरण व दुरुस्ती करणे तांत्रिकदृष्टया आवश्यक आहे. तसेच अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जलतरण तलाव हा नव्याने विद्युत विषयक कामे करणे गरजेचे आहे. त्यानुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून र.रु.२,९५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी मा.स्थायी समिती ठराव क्र.१२३३३ दि. ०१/०९/२०१५ अन्वये यापूर्वी र.रु.१,४८,०८,७९९/- चे खर्चास मान्यता मिळाली आहे. तरी उर्वरित सुधारित र.रु.१,४६,९१,२०१/- चे खर्चास मान्यता देणे आवश्यक असल्याने सुधारित एकत्रित अशी र.रु.२,९५,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३५ | विषय क्रमांक – २७
दिनांक – ०६/०५/२०१६ | विभाग – मध्यवर्ती सा.भां. वैद्यकीय
सुचक – मा.नारायण बहिरवाडे | अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/२४२/२०१६ दि.०३/०५/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मनपाच्या तालेरा रुग्णालयाच्या नविन इमारतीमधील कॅरीडॉर, सर्व कार्यालय अंतर्गत भाग, स्वच्छतागृहे व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाईचे काम करणेकामी मे.डी.एम.एन्टरप्राईजेस यांचेकडून (सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने) त्यांची स्वतःची अत्याधुनिक उपकरणे, रसायने, व मनुष्य बळाचा वापर करुन तांत्रिक पध्दतीने ( Mechanized Cleaning ) साफसफाई व स्वच्छता करुन घेणेकामी त्यांचेकडून ई निविदा कार्यप्रणालीद्वारे प्राप्त झालेल्या ई निविदा दर प्रती महिना खर्च र.रु.२,३३,४२०/- प्रमाणे निविदेत नमुद केल्याप्रमाणे ३ वर्षे करण्यास येणा-या र.रु.८४,०३,१२०/- चे खर्चास किमान वेतन कायदा दराप्रमाणे मनुष्यबळाचे दर ग्राहय धरुन व इतर कोणतीही वाढ न देता म्हणजेच आवश्यक लागणारी उपकरणे, रसायने व तत्सम बाबींसाठी लागणा-या खर्चामध्ये वाढ न करता कामकाज करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३६ | विषय क्रमांक – २८
दिनांक – ०६/०५/२०१६ | विभाग – मध्यवर्ती सा.भां. वैद्यकीय
सुचक – मा.नारायण बहिरवाडे | अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मऔभां/३/कावि/२४१/२०१६ दि.०३/०५/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागामध्ये सी.टी.स्कॅन सेंटर करिता राखून ठेवण्यात आलेल्या नियोजित जागेमध्ये मे.रुबी एलकेअर सर्व्हिसेस प्रा.लि. हे स्वत:ची मशिनरी व स्वत:चे मनुष्यबळ तसेच या अनुषंगाने येणारा सर्व खर्च करुन प्रती सी.टी.स्कॅन करिता र.रु.१,२००/- प्रमाणे चार्जेस घेऊन सेंटर चालवित आहेत. सदर सी.टी.स्कॅन सेंटरची मुदत दि.३१/०७/२०१६ रोजी संपुष्टात येणार असल्याने तसेच मागील ५ वर्षामध्ये त्यांनी सी.टी.स्कॅन बाबत अधिक उत्तम व जलद सेवा सुविधा वेळेत पुरविल्या असल्याने पुढील ५ वर्षे कालावधीकरीता नव्याने करारनामा करुन मुदत वाढवून देणेस तसेच त्यांचेकडून प्रतीमहा र.रु.१,२४,५४८/- प्रमाणे भाडे घेणेस व त्यावर १०% प्रतीवर्षी वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३७ विषय क्रमांक – २९
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/२५४/२०१६ दि.०२/०५/२०१६.
विषय - चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र येथील तळयातील गाळ काढणे व सुशोभिकरण करणेबाबत.

विषय क्रमांक २९ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३८ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/२५३/२०१६ दि.०२/०५/२०१६.
विषय :- पिं.चिं. मनपाच्या मैलाशुध्दीकरण केंद्रात तयार होणा-या स्लजची वाहतुक करणेबाबत.

विषय क्रमांक ३० चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१३९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – मध्यवती सा.भां.वैद्यकीय
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/९८/२०१६ दि.११/०४/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. सेंटर मे. रुबी एलकेअर यांना दि.९/५/२०११ पासून ५ वर्षे कालावधीसाठी CGHS च्या (-)२७% दराने without contrast व with contrast MRI करुन देणेकामी करारनामा करुन कामाचे आदेश

निर्गत करणेत आले होते. सदर करारनाम्याची मुदत संपत आली असलेने तसेच नवीन जादा क्षमतेचे MRI मशिन निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करणेकामी लागणारा कालावधी विचारात घेता मे. रुबी एलकेअर यांना दि. ९/५/२०१६ पासून किमान तीन महिने कालावधीसाठी पूर्वीच्या करारनाम्यास अधिन राहून मुदतवाढ देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४० विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/११/२०१६ दि.०३/०५/२०१६.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अ प्रभाग/६१/१३-२०१५-१६ प्रभाग क्र.२७ मधील आय.टी.आय.इमारतीची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.युनिक ट्रेडर्स, निविदा र.रु.४२,०१,५४३/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख एक हजार पाचशे त्रेचाळीस फक्त) पेक्षा २४.६०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३३,२६,३६२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरिअलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४१ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/१०/२०१६ दि.०३/०५/२०१६.

विषयः-प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील शिंदेवस्ती येथील बी.आर.टी.एस.रस्ता ते रेल्वेलाईन पर्यंतचा रस्ता विकसित करणेबाबत.

विषय क्रमांक ३३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१४२ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.विमल काळे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/२१६/२०१६ दि.०३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र शासन मान्य दर करार मंजूर दराने महाराष्ट ३ राज्य हातमाग महामंडळ मुंबई यांचेकडून प्रस्तावात नमूद ९ बाबी महिला गणवेश साहित्य खरेदी करणेस एकुण र.रू. २६,९८,८८०/- (अक्षरी र.रू. सवीस लाख अठ्ठ्याण्णव हजार आठशे ऐंशी फक्त) चे खर्चास दर करारनुसार करारनामा न करता थेट खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१४३ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५०३/१६ दि.०२/०५/२०१६
विषयः-प्रभाग क्र.९ संभाजीनगर मधील मुख्य रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे व अधुनिकरण, सुशोभिकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ३५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४४ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग-माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/२/कावि/२९८/२०१६ दि.२९/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरण येथील ज्ञान प्रबोधिनीचे माजी प्राचार्य व कार्यवाह मा.श्री.वा.ना.अभ्यंकर यांनी शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केली असल्याने त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांना मानपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम मा. महापौर यांच्या हस्ते १ मे २०१६ रोजी संपन्न होणार आहे. सदर मानपत्र व त्यांचा यथोचित मानसन्मान करण्यासाठी चांदीचा कलश,पुणेरी पगडी, शॉल, श्रीफळ इत्यादीसाठी थेट पद्धतीने अंदाजे र.रु.८०,०००/- (अक्षरी र.रु. ऐंशी हजार फक्त) चे सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४५ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग-पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/२५२/२०१६ दि.०२/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/११/८/२०१५-१६ मधील क व ड प्रभागातील (क,ड व ई) स्लजची मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतुक करणे या कामासाठी मे.शुभम उद्योग यांचेकडुन नि.र.रु.४४,५७,१९९/- पेक्षा -१३.१०% कमी या दराने करुन घेणेस तसेच यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४६ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग-पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/१०९/२०१६ दि.३०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपामधील मा.महापौर यांचे दिनांक ३०/०४/२०१६ रोजीचे पत्रानुसार मा.सत्तारुढ पक्षनेत्यांसह एकुण ६ महीला सदस्यांच्या देशातील पहीले सेंद्रीय राज्य म्हणून घोषित झालेल्या सिक्कीम राज्यातील विविध प्रकल्पांची पहाणी करणेसाठी दौ-याचे आयोजन करणेची मागणी केली आहे. त्यानुसार मा.महापौर यांचे दिनांक ३०/०४/२०१६ चे पत्रामध्ये नमुद यादीनुसार सत्तारुढ पक्षनेत्या, अध्यक्ष ब प्रभाग समिती व इतर ४ महिला सदस्यांसह एकुण ६ महिला सदस्यांच्या सिक्कीम येथील मे महीन्यामधील दुस-या आठवड्यात आयोजित करणेत येणा-या अभ्यास दौ-यासाठी येणा-या खर्चासाठी मागविणेत आलेल्या कोटेशन पैकी सर्वात कमी दराचे मे.सदगुरु ट्रॅव्हल्स अन्ड टूर्स, पिंपरी यांचे अंदाजे र.रु. ३,७०,२००/- + सर्व्हीस टॅक्स (असे एकुण र.रु. ३,८०,३०४/-) चे खर्चास मान्यता देणेचा तसेच सदरच्या खर्चापैकी मा.सत्तारुढ पक्षनेत्यांसह अध्यक्षा ब प्रभाग समिती व इतर ४ महिला सदस्या असे एकूण ६ सदस्यांचा खर्च नगरसचिव विभागाकडील मा.सदस्यांचा अभ्यास दौरा व प्रशिक्षण या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४७ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय (विद्युत)

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/वि/कावि/जा/५०९/२०१६ दि.३०/०४/१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ०१/०५/२०१६ रोजी माजी महापौर कै.भिकू वाघेरे पाटील ५६ वी महापौर चषक राष्ट्रीय बॉडी बिल्डींग स्पर्धा २०१६-२०१७ चे आयोजन करणेत आलेले आहे. सदरच्या स्पर्धेकरीता जादा व प्रखर प्रकाश व्यवस्था व विशिष्ठ प्रकारची ध्वनिक्षेपण व्यवस्था व जनरेटर व्यवस्था आवश्यक आहे. सदरचे काम हे विशेष प्रकारचे

असल्याने कामाचा पूर्वानुभव असलेल्या ठेकेदारांकडून सदर कामाबाबतचे दर पत्रक मागवून काम करून घेणे आवश्यक आहे. तदनुसार वरील संपूर्ण काम दिनांक ३०/०४/२०१६ रोजी कार्यरत करून तसेच विद्युत निरीक्षक यांची तपासणी घेऊन दिनांक ०१/०५/२०१६ रोजी संपूर्ण सिस्टीम कार्यरत राहील याची दक्षता घेणे सदर ठेकेदारास बंधनकारक राहील. सदर कामाचे फ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागामार्फत दरपत्रक मागविले असता मे.मोरया मंडप डेकोरेटर यांचे दर सर्वात कमी प्राप्त झाले आहेत. तरी सदरचे काम मे.मोरया मंडप डेकोरेटर यांचेकडून थेट पद्धतीने करून घेण्यास व येणा-या र.रु ९,५२,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. व सदरचा खर्च फ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभाग मधील ध्वनिक्षेपण व्यवस्था या लेखाशीर्षकातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४८ विषय क्रमांक – ४०
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/२१४/२०१६ दि.०२/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागातील कार्यालयाकरिता आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीकामी ऑनलाईन निविदा नोटिस क्रं. ४४/२०१५-१६ प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदेमधील १) मे.रेखा इंजिनिरिंग वर्क्स चिंचवड यांना बाब क्रं १,२,३,४,६,७, व ९ साठी र.रु १३,३१,१२६/- २) मे.निर्मिती इंजिनिअरिंग कार्पो.पिंपरी यांना बाब क्रं १,२,४,५,६,७,८ व ९ साठी र.रु १३,५५,१३६/- यांचेकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकुण र.रु.२६,८६,२६२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१४९ विषय क्रमांक – ४१
दिनांक – ०६/०५/२०१६ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/२/कावि/५२/२०१६ दि.२८/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्वच्छ भारत अभियान नागरी / (स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महाराष्ट्र शासनास सादर करावयाचा प्रकल्प अहवाल) डीपीआर (तयार करणेसाठी मे.इन्फ्रा इंडिया प्रा.लि., यांनी मागणी केले प्रमाणे टप्प्या टप्प्याने एकूण र.रु. ४५,००,०००/- + सर्व्हिस टॅक्स (प्रचलित दरानुसार) इतकी रक्कम अदा करणेस तसेच स्वच्छ भारत प्रकल्प अहवालातील सर्व कामांसाठी

आवश्यकतेनुसार निविदापूर्व व निविदेत्तोर कामांसाठी मे.इन्फ्रा इन इंडिया प्रा.लि. यांचेमार्फत प्रकल्प सल्लागाराची कामे करणेसाठी येणा-या प्रत्यक्ष रक्कमेच्या खर्चास + सर्व्हिस टॅक्स (प्रचलित दरानुसार) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५०　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०६/०५/२०१६　　　　　　　　　　विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.अमिना पानसरे　　　　　　　　　अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/२/कावि/५१/२०१६ दि.२८/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सेक्टर क्र.१८ चिखली मैलाशुध्दीकरण केंद्रातील उर्वरित जागेत आकर्षक लॅन्डस्केपिंग डिझाईन्स करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामासाठी या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी वास्तु विशारद मे.विकास आणि निलीमा भोसेकर, पुणे यांची मनपाचे वास्तु विशारद सल्लागार पॅनलवर नेमणुक करुन सदरचे काम करणेसाठी मनपाचे प्रकल्प खर्चाच्या २% सर्व करासहित वास्तू विशारद फी अदायगी करणेस व त्यांचेसोबत करानामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५१　　　　　　　　　　विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०६/०५/२०१६　　　　　　　　　　विभाग-माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.अमिना पानसरे　　　　　　　　　अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/कावि/९/३३७/२०१६ दि.३०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रशासन विभागाकडील आदेश क्रं. प्रशा/२/कावि/८३७/१५ दि.१३/१०/१५ अन्वये संगणक अधिकारी यांना मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांना सहाय्यक आयुक्त यांचा दर्जा देण्यात आलेला आहे तसेच प्रशासन विभागाकडील पत्र क्रं. प्रशा/२/कावि/१९१/१६ दि.०१/०४/१६ अन्वये सदर पदास वाहन व्यवस्था देण्याबाबत कळविलेले आहे. मा.आयुक्त सो. यांनी सदर पदास तूर्त वाहन देण्यास मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्रं.वाहन २०१४/प्र.क्रं.९/१४/विनियम दि.०४ ऑगस्ट २०१४ वाहन खरेदीस ६ लाखापर्यंतची मर्यादा दिलेली आहे त्यानुसार मे.पंडीत ऑटोमोटिव्ह, पिंपरी यांचे कोटेशन क्रं.४३२३ दि.२२/०४/१६ नुसार TATA TIAGO X२ १.०५ D COLOUR WHITE या कारची सर्व करासहित रक्कम रू. ५,७२,९००/- (अक्षरी र.रू.पाच लाख बहात्तर हजार नऊशे फक्त) इतकी होत आहे. सदरचे वाहन मे.पंडीत ऑटोमोटिव्ह, पिंपरी यांचेकडून थेट पध्दतीने खरेदी करणेकामी आगाऊ रक्कम अदा करून येणा-या खर्चास तसेच

कार्यशाळा विभागाकडील वाहन खरेदी या लेखाशीर्षामधून सदर रक्कम खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५२ विषय क्रमांक – ४४
दिनांक – ०६/०५/२०१६
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:-मा.नारायण बहिरवाडे व मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र. १५१९६ दि. १७/२/२०१६ मध्ये “करारनामा करणेस मान्यता” या मजकुरानंतरचा सर्व मजकूर वगळून त्याऐवजी “देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा” हा मजकूर समाविष्ठ करणेची दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५३ विषय क्रमांक – ४५
दिनांक – ०६/०५/२०१६
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे
संदर्भ:-मा.नारायण बहिरवाडे व मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव-

निगडी गावठाण प्रभाग क्र. १३ मध्ये सन २०१६-१७ चे मंजूर अंदाजपत्रकानुसार नविन कामाच्या निविदा काढणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट नुसार वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. २२,६०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५४ विषय क्रमांक – ४६
दिनांक – ०६/०५/२०१६
सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:-मा.नारायण बहिरवाडे व मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव-

वॉर्ड क्र. २४, ४२ मधील जलनि:सारण व्यवस्था सुधारणा करणे या कामाची निविदा क्र. १/३५-२०१५-१६ निविदा र.रू. २७,९५,११२/- व हे काम मे. छोटेलाल चौहान यांना २७.२७% कमी या दराने देणेत आलेले आहे व या कामास यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र. १२३५५ दि. ८/९/२०१५ अन्वये र.रू. २१,३४,५२९/- चे खर्ची मान्यता देणेत आली आहे. तसेच सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रू. ४०,००,०००/- महापालिका ठराव क्र. ६६३ दि. ६/४/२०१५ अन्वये

मान्यता देण्यात आलेली आहे. विषयांकित काम ७०% पुर्ण झाले असून वॉर्ड क्र. २४,४२ मधील निराधार नगर, भिमनगर, चिंचवड झोपडपट्टी क्षेत्र असल्याने स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत झोपडपट्टी धारकांना वैयक्तिक सौचालये बांधणेसाठी ड्रेनेजलाईन टाकणे गरजेचे आहे. याबाबत मा.आयुक्त यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने विषयांकित कामास र.रू. ८,५३,०४२/- वाढीव रक्कम खर्च होणार आहे. तरी वरील कामास यापुर्वीची खर्च मान्यता र.रू.२१,३४,५२९/- वाढीव खर्च र.रू.८,५३,०४२/- एकुण सुधारित खर्च र.रू.२९,८७,५७१/- पर्यंत खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५५ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०६/०५/२०१६

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.नारायण बहिरवाडे व मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव-

वॉर्ड क्र.५० पद्मजी पेपर मील थेरगाव परिसरातील जलनि:सारण विषयक कामे करणे व उर्वरीत ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामाची निविदा क्र.१/३१-२०१५-१६ निविदा र.रू. १३,८३,६८२/- व हे काम मे. छोटेलाल चौहान यांना ३०.०५% कमी या दराने देणेत आलेले आहे व या कामास यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र. १३८४९ दि. १/१२/२०१५ अन्वये र.रू. १०,१६,२८०/- चे खर्ची मान्यता देणेत आली आहे. तसेच सदर कामास मुळ प्रशासकीय मान्यता र.रू. ७५,००,०००/- महापालिका ठराव क्र.६६३ दि.६/४/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. विषयांकित काम ७०% पुर्ण झाले असून वॉर्ड क्र.५० मधील जगतापनगर थेरगांव झोपडपट्टी क्षेत्र असल्याने स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत झोपडपट्टी धारकांना वैयक्तिक सौचालये बांधणेसाठी ड्रेनेजलाईन टाकणे गरजेचे आहे. याबाबत मा.आयुक्त सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने विषयांकित कामास र.रू.४२,४३,३८९/- वाढीव रक्कम खर्च होणार आहे. तरी वरील कामास यापुर्वीची खर्च मान्यता र.रू.१०,१६,२८०/- वाढीव खर्च र.रू.४२,४३,३८९/- एकुण सुधारित खर्च र.रू.५२,५९,६६९/- पर्यंत खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६१५६ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०६/०५/२०१६

सुचक – मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक – मा.संदिप चिंचवडे

संदर्भ:-मा.नारायण बहिरवाडे व मा.संदिप चिंचवडे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे मुख्य समन्वयक तथा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल यांची मानधनावरील

कामकाजाची मुदत दि.७/५/२०१६ रोजी संपुष्टात येत असून आपत्ती व्यवस्थापन कामकाजाचे महत्व व गरज पाहता त्यांना पुढील ११ महिने (अकरा) कालावधी करिता र.रू.३५,०००/- एकत्रित मानधनावर नेमण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९२१/२०१६
दिनांक – ०७/०५/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.